महाराष्ट्र शासन

ईमेलद्वारे-

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.२१६/फ-१०
महसूल व वन विभाग,
खो.क्र.४५५/४६० विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ /०८/२०२२.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना चुंचा- मुखेड रोड, आणि मुदखेड-जांब राज्यमार्ग क्र. २६१ चे दुपदरीकरण करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील १८.१८ हे राखीव वनक्षेत्र वळतेकरणाबाबत.

विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भिय पत्राचे अनुषंगाने खालील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करावेत.

१. प्रकल्पामध्ये वनभंग झालेला असल्याने प्रकल्प यंत्रणेकडून दंडात्मक नक्त वर्तमान मूल्य (Penal NPV) वसूल करण्यात आली किंवा कसे?

२. प्रकल्पासाठी वळती करावयाच्या वनजमीन मौजे. रोही पिंपळगाव तांडा गट क्र. ११७ आणि गट क्र.१२८ मध्ये खाजगी खातेदारांची नावे नमूद करण्यात आली आहेत. सदरची जमीन वनजमीन आहे किंवा कसे? असल्यास त्यावरील हक्कधारकांना जमिनीचा मोबदला देण्यात आला किंवा कसे?

३. पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत करण्यात आलेली मौजे.गुंडवळ, ता.माहूर, जि.नांदेड येथील जमीन वनेत्तर जमीन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र जमिनीचा ७/१२ पहाता सदरची जमीन वनजमीन असल्याचे दिसून येते. सदर प्रकल्प राज्य शासनाचा असल्याने पर्यायी वनीकरणाकरीता वनेत्तर जमिनीची आवश्यकता आहे किंवा कसे

(गणेश जाधव)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),औरंगाबाद.

२. उप वनसंरक्षक, नांदेड.